वाचा :- महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्रं.सर्किण -२०१८/प्र.क्रं.१३/मातंक तारीख २२फेब्रुवारी २०१९

क्रं.नागरी भूमापन -३/सनद फी आकारणी/प्र.क्रं.१३८/२०

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख
(म.राज्य) , पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांक १२/११/२०२०

परिपत्रक

**विषय :- ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाचे सनद फी आकारणीबाबत.**

ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सर्किण -२०१८/प्र.क्रं.१३/मातंक तारीख २२ फेब्रुवारी २०१९ चे शासन निर्णयान्वये राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन प्रकल्पाअंतर्गत गावठाणातील मिळकतींचे भूमापन करून मिळकतपत्रिका स्वरूपात अभिलेख तयार करणे व जनतेस देणे असे अपेक्षित आहे.सदर शासन निर्णयामध्ये खर्चाबाबत व सनद फी वसुलीबाबत तरतूद दिलेली आहे ती खालीलप्रमाणे.

भूमि अभिलेख विभागामार्फत मिळकतपत्रिका तयार करणे (भाग एक ) व ग्रामीण विकास विभागामार्फत मालमत्ता पत्रक तयार करणे व मालमत्ता नोंदवही तयार करणे (भाग दोन ) असे दोन्ही भाग मिळून सर्वसाधारणपणे प्रती मालमत्ता रू ५००/- इतक्या सरासरी खर्चास मान्यता देण्यात येत असून मालमत्तावर मालमत्ता क्षेत्राप्रमाणे सनद व इतर फी म्हणून सरासरी रू ५००/- प्राप्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही रक्कम प्राप्त करत असताना ज्या मिळकतीचे क्षेत्र २५ चौ.मी. पेक्षा कमी असेल त्याची फी सवलतीच्या दराने आकारण्यात येईल.मिळकतीचे क्षेत्रानिहाय आकारावयाच्या रक्कमेबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील .

महाराष्ट्र राज्यात अत्याधुनिक ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या १११ गावाचा गावठाणातील मिळकतींचे चौकशी अंती सत्ताप्रकार निहाय मिळकतीचे क्षेत्र व संख्या उपलब्ध आहे . १११ गावाचा डाटा तपासणी करणेत आला . सदर डाटाचे आधारे एकत्रीत अभ्यास केला असता, शासन निर्णयाचे अनुंषगाने ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाचा खर्च वसुल करणेकरीता खाजगी धारकाच्या मिळकत क्षेत्राच्या टप्पेनिहाय खालीलप्रमाणे सनद फी दर ठरविण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | रूपये |
|---|---|---|
| १ | १ चौ.मी. ते २५ चौ.मी पर्यंत | १२५ |
| २ | २५ चौ.मी पेक्षा जास्त ते ५० चौ.मी पर्यंत. | २५० |
| ३ | ५० चौ.मी पेक्षा जास्त ते १०० चौ.मी पर्यंत. | ५०० |
| ४ | १०० चौ.मि.पुढील प्रत्येक चौ.मी क्षेत्रास | र.रू ५/- प्रति चौ.मि.या दराप्रमाणे आकारण्यात येईल |

उपरोक्त प्रमाणे ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाची सनद फी नियमाप्रमाणे वसुल करणेत यावी.

स्वाक्षरी/-xxx
(एस. चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे

प्रत :- अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरीक्त संचालक भूमि अभिलेख , पुणे यांना माहीतीसाठी

Scanned with CamScanner

प्रत :-उपसंचालक भूमि अभिलेख संल्गन जमाबंदी आयुक्त (नागरी भुमापन ) (भूमापन) (एकत्रीकरण) पुणे यांना माहीतीसाठी

प्रत :-उपसंचालक भूमि अभिलेख,पुणे /मुंबई /नाशिक /औरंगाबाद /अमरावती /नागपुर यांना माहीती व आवश्यकता कार्यवाहीसाठी

प्रत :-सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,यांना माहीती व आवश्यकता कार्यवाहीसाठी

प्रत :- सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांना माहीती व आवश्यकता कार्यवाहीसाठी

प्रत :- सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांना माहीती व आवश्यकता कार्यवाहीसाठी

निर्गमित

(बाळासाहेब काळे)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे

Scanned with CamScanner